MHLA090003952026

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३३/२०२६ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

(रामदास सोपानराव चामले वि. निरंक)

१. अर्जदाराने स्वतःच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मंजूर होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार नामे रामदास सोपानराव चामले यांचे वडील नामे सोपान व्यंकोबा चामले यांचे दि.२३.०५.२०२५ रोजी आणि आई प्रयागबाई सोपान चामले यांचे दि. १४.०६.२०२२ रोजी दोघांचेही मौजे अरसनाळ, ता. उदगीर, जि. लातूर येथे निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, सदर मयतास अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारसदार नाही.

३. अर्जदाराचे विशिष्ट कथन असे की, उपरोक्त मयतांच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी अर्जदाराला मयत सोपान व्यंकोबा चामले आणि प्रयागबाई सोपान चामले यांच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदार हे संबंधित कार्यालयामध्ये गेले असता त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्याचे सूचित करण्यात आले. सबब, प्रस्तुत अर्ज.

४. अर्जदार यांनी अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी स्वतःचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ दाखल करून अर्जातील मजकुराचा पूनःउल्लेख केला आहे. तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे म्हणजेच स्वतःच्या नावे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ सोबत मयत सोपान व्यंकोबा चामले आणि प्रयागबाई सोपान चामले यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदाराच्या आधार कार्डची प्रत व वारसांबाबत स्वयंघोषणा पत्र इ. दस्त अभिलेखावर दाखल करून नि.क्र.१३ वरील पूरसीस अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

५. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'यशवंत' या दिनांक १२.०३.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द केले. मात्र मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

६. उपरोक्त कागदपत्रांच्या अनुषंगाने तसेच सादर केलेल्या पुराव्यावरून असे स्पष्ट

होते की, सोपान व्यंकोबा चामले आणि प्रयागबाई सोपान चामले हे अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या तारखेस मयत झालेले आहेत; तसेच त्यांनी मृत्यूपत्र केलेले नाही. असे देखील स्पष्ट होते की, जाहीर प्रगटन दिल्यानंतर मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने ते उपरोक्त मयत व्यक्तिंचे वारसदार असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. येथे असे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदाराने उपरोक्त सर्व बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासारखी कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नाही. तसेच प्रस्तुत अर्ज हा अर्जदाराने केवळ मयत सोपान व्यंकोबा चामले आणि प्रयागबाई सोपान चामले यांचे वारस असल्याचे औपचारिकपणे मान्य करण्याकरिता दाखल केल्यामुळे अर्जदाराची गरज लक्षात घेवून त्यांना तसे औपचारिकपणे वारस मान्य करणे गरजेचे आहे. सबब, अर्जदाराच्या नावे ते मयत सोपान व्यंकोबा चामले आणि प्रयागबाई सोपान चामले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः खालील आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे मयत सोपान व्यंकोबा चामले यांचे कायदेशीर वारस आहेत, असे औपचारिक मान्य करण्यात येत आहे.

३. अर्जदार हे मयत सोपान व्यंकोबा चामले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) हे अर्जदाराने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

४. मुंबई नियमन ८, १८२७ चे कलम ७ प्रमाणे तसेच दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे प्रस्तुत प्रमाणपत्रावर तशी टीप नमूद करावी.

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.04.22 17:04:12 +0530

दिनांक : २२.०४.२०२६ (भालचंद्र रा. झेंडे)

ठिकाण : उदगीर. ३ रे सह–दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

उदगीर.